# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील क्रिडा धोरणांअंतर्गत पंजीकृत व्यायाम शाळेसाठी नागपूर सुधार प्रन्यासची जागा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१) २६२४ (१८-०७-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २०१२ पासून अंमलात आलेल्या क्रीडा धोरणांतर्गत पंजीकृत व्यायाम शाळेसाठी २ लाखा रुपयांच्या अनुदानात वाढ करून सन २०१९ मध्ये ७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येत होते. यामध्ये पुन्हा वाढ करून बांधकामासाठी १४ लाख रुपयाचे अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार व्यायाम शाळा बांधण्यासाठी लागणारी महानगरपालिकेची, नागपूर सुधार प्रन्यासची जागा वार्ड स्तरावर उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (१७-०३-२०२६) :** (१) होय.

(२) व्यायामशाळा विकास अनुदान योजनेंतर्गत व्यामायशाळा बांधकामासाठी अनुदान दिले जाते. सदर योजनेंतर्गत जागा उपलब्ध करुन देण्याची कोणतीही तरतूद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हा वार्षिक योजनेचा सुमारे ५ कोटींचा निधी परत शासनाकडे वर्ग झाल्याबाबत

**(२) २६९२ (१७-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा वार्षिक योजनेच्या विविध विभागांचा सुमारे रुपये ५ कोटी एवढ्या रक्कमेचा निधी अर्खचित राहिल्याने तो राज्यशासनाकडे परत गेल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या

सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदरील निधीचा येथील संबंधित अधिकाऱ्यांनी विनियोग केला नसल्याने निधी परत गेला, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर निधी अखर्चित रहाण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरील निधी अखर्चित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२६) :** (१) होय.
(२) जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली, कार्यालयामार्फत जिल्हा परिषदेकडील यंत्रणांना रुपये ४३४.२३ लक्ष व नगर पालिका प्रशासन या विभागाला रुपये ४९.९९ लक्ष एवढा निधी बी.डी.एस. प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला होता.सदर वितरीत करण्यात आलेला निधी संबंधित यंत्रणांनी आहरीत न केल्यामुळे निधी व्यपगत झाला आहे.

मार्च, २०२५ अखेरचा आढावा घेण्याकरीता आयोजित केलेल्या बैठकीत जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, हिंगोली यांनी संबंधित यंत्रणांना याप्रकारच्या चुका भविष्यात झाल्यास शासन नियमाप्रमाणे संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल, अशी ताकिद दिली आहे.
(३) लागु नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतींना १६ व्या वित्त आयोगानुसार वाढीव निधी मंजूर करणेबाबत

**(३) २९३२ (०९-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १४ व १५ व्या वित्त आयोगाचा निधी देताना आलेल्या अडचणी व त्यावरील उपाय समजून घेण्यासाठी तसेच ग्रामपंचायतीला १६ वा वित्त आयोग लागू करण्यासाठी शासनाने दहा सदस्यांचा समावेश असलेली विशेष समिती नियुक्त केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वीच्या वित्त आयोगाच्या येणाऱ्या अडचणी आणि त्यावर उपाय करण्यासाठी सोळाव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष आणि समितीकडे राज्य शासनातर्फे पोपटराव पवार, कार्याध्यक्ष, आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती, महाराष्ट्र राज्य यांनी अडीच हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना किमान १५ ते २० लाख रुपये देण्याच्या मागणीसह १५ महत्वाचे मुद्दे असलेला अहवाल माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने २५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना विकासकामांसाठी वित्त आयोगाकडुन जास्तीत जास्त निधी मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २३ मार्च २०२४ अन्वये १६व्या केंद्रीय वित्त आयोगास, महाराष्ट्र शासनाकडून सादर करावयाचे निवेदन तयार करण्यासाठी

श्री.सुधीर श्रीवास्तव, सेवानिवृत्त, भाप्रसे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.
(२)१६ व्या केंद्रीय वित्त आयोगाने दिनांक ८ व ९ मे, २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचा दौरा केला असून सदर दौऱ्यादरम्यान राज्य शासन व इतर संस्थासोबत बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामधील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधीसमवेत झालेल्या बैठकीदरम्यान, केंद्रीय वित्त आयोगास श्री.पोपटराव पवार, कार्याध्यक्ष, आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती, महाराष्ट्र राज्य यांनी अहवाल सादर केला आहे.
(३) १६ व्या केंद्रीय वित्त आयोगाची स्थापना दिनांक ३१/१२/२०२३ च्या अधिसूचने अन्वये करण्यात आली असून, त्यांचा अहवाल दिनांक १७/११/२०२५ रोजी केंद्र शासनास सादर केला आहे. सदरचा अहवाल केंद्र शासनाने दिनांक ०१/०२/२०२६ रोजी सादर केलेल्या अर्थसंकल्पात स्वीकृत केला आहे. केंद्र शासनाकडून निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) ३२१५ (१८-०७-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुदानित व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील माहे मे, २०२५ अखेर शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,
(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-०६-२०२६) :** (१) व (२) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी सन २०२२ च्या आधारे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण ८० टक्के मर्यादेत एकूण ३२,०१७ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार २३,८६६ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी सन २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना १९८२ ची नागरी सेवा निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत

**(५) ५२८३ (१४-१२-२०२५) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनातील २३ लाख कर्मचाऱ्यांपैकी १ लाख कर्मचाऱ्यांनी एकीकृत पेन्शन योजना (UPS) ला पसंती दर्शविली असून केंद्र सरकारने घोषित केलेल्या UPS (Unified Pension Scheme) ही राज्य

शासकीय कर्मचाऱ्यांना जशीच्या तशी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाची सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजना व केंद्राची एकीकृत योजना ह्या वर्गणीवर आधारित असून या योजनांना मिळणारा अल्प प्रतिसाद पाहता राज्य शासनाने सर्व कर्मचाऱ्यांना १९८२ ची नागरी सेवा निवृत्ती योजना लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वित्त विभागाच्या दिनांक २०/०९/२०२४ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१/११/२००५ रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना दिनांक ०१/०३/२०२४ पासून लागू करण्याचा तसेच केंद्र सरकारने घोषित केलेल्या UPS (Unified Pension Scheme) शासकीय कर्मचाऱ्यांना जशीच्या तशी लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने सुधारीत निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत सादर करावा अश्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर विकल्प प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
राज्यात एकीकृत निवृत्तीवेतन योजना (Unified Pension Scheme) अंमलात आणण्याच्या दृष्टीकोनातून अधिसूचना दिनांक ०६/०२/२०२६ रोजी निर्गमित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या तपासणीत दोन मेडिकल दुकानांचे परवाने रद्द केले असल्याबाबत

**(६) ५४३५ (१४-१२-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यात अन्न औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत दोन मेडिकल दुकानांचे परवाने रद्द केले असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न औषध प्रशासनाने रत्नागिरी जिल्ह्यात केलेल्या तपासणी अहवालानुसार केवळ दोन औषधांच्या दुकानांमध्ये त्रुटी आढळल्या व इतर दुकानांमध्ये कोणत्याही त्रुटी आढळल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तपासणीचा अहवालानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील नियमांचे पालन न केलेल्या सदर औषध दुकानांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ (०८-०५-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

माहे सप्टेंबर, २०२५ या कालवधीत अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत एका मेडिकल दुकानांचे परवाने रद्द व उर्वीरित मेडिकल दुकानांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम, १९४५ अंतर्गत माहे एप्रिल, २०२५ पासून माहे डिसेंबर, २०२५ अखेर रत्नागिरी जिल्ह्यात सुमारे ७१ पेढ्यांच्या तपासण्या करण्यात आल्या असून त्यापैकी एकूण १२ पेढयांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आल्या आहेत. त्यापैकी ०१ पेढीचा परवाना रद्द केला असून अन्य ०८ पेढ्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित ०३ पेढयांचे परवान्यांवर कारवाई करण्यात येत आहे. तपासणी करण्यात आलेल्या पेढींपैकी एकूण ०८ पेढ्यांनी त्यांचे परवाने प्रत्यार्पित केले आहेत.

---

## अकोला जिल्ह्यातील रस्ते व पुलांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७) ६८३९ (२४-०३-२०२६) श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील अकोट, तेल्हारा, बाळापूर, पातूर, बार्शीटाकळी या पाच तालुक्यात अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे ३४ रस्ते आणि १२ पुलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ते व पुलाच्या दुरुस्तीकरीता रुपये ३५ कोटी १७ लाख रुपयांचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर पुलांच्या कामांकरीता आवश्यक निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२२-०५-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
या पाच तालुक्यातील काही रस्त्यांच्या ठराविक लांबीत अतिवृष्टीमुळे रस्त्याची हानी झालेली होती व सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पावसाचा जोर कमी होताच या रस्त्यांची-पुलांची दुरुस्ती करुन घेण्यात आली.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्नांकित तालुक्यांतील रस्ते व पूल हे केवळ किरकोळ स्वरूपात क्षतिग्रस्त झालेले असल्याने, मंजूर 'वार्षिक देखभाल व दुरुस्ती' कार्यक्रमांतर्गत सदर रस्ते व पूल दुरुस्त करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक येथील देवळा शहरातून जाणाऱ्या विंचूर-प्रकाशा राष्ट्रीय महामार्गाच्या दुसऱ्या लेनचे काम सुरु करण्याबाबत

**(८) ६८९१ (२४-०३-२०२६) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील देवळा शहरातून जाणाऱ्या विंचूर-प्रकाशा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक एनएच ७५२ जी

वरील एका लेनचे कॉंक्रीटीकरणाचे काम करण्यात आले परंतु दुसऱ्या लेनचे काम संबंधित बांधकाम कंपनीने अद्याप सुरु न केल्यामुळे रस्ता धोकादायक ठरु लागला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या कामामुळे विंचूर-प्रकाशा मार्गावरील वाहतूक सुलभ होईल आणि प्रवासाचा वेळ कमी होईल.हा रस्ता नाशिक आणि इतर जिल्ह्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा असून सदर रस्त्याचे अपूर्ण काम, उडणारी धूळ, अर्धवट खोदकाम व वाहतूक नियोजनाचा अभाव यामुळे अनेक समस्यांचा सामना तेथील नागरिकांना करावा लागत आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दुसऱ्या लेनचे काम तातडीने सुरु करुन ते ठराविक कालमर्यादेत पूर्ण करावे अशी मागणी नागरिकांनी केलेल्या मागणीची पूर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०५-०५-२०२६) :** (१) नाही, हे खरे नाही. विंचूर- प्रकाशा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२ जी या देवळा शहरातून जाणाऱ्या लांबीत दोन्ही बाजूचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नियंत्रक, वैध मापन शास्त्र हे पद तातडीने भरणेबाबत

**(९) ७४१८ (२४-०३-२०२६) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य वैद्यमापन शास्त्र विभागाचे नियंत्रक पद हे गत दीड वर्षापासून रिक्त असून राज्यातील ग्राहकांच्या दैनंदिन व्यवहाराशी थेट संबंधित महत्त्वाच्या अंमलबजावणी यंत्रणेतील हा एक विभाग आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागात कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे वजनात तफावत, चुकीचे लेबलिंग, ज्यादा दर आकारणी इत्यादी घटनांमध्ये वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा व त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निरीक्षक विभागाच्या कार्यालयाकडून वजन व मापांची पडताळणी केली जाते व त्या वजन मापावर मुद्रांकन केले जाते. वजन माप विषयक कायद्यातील तरतुदी ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असून ग्राहक संरक्षणार्थ कायदा/ नियमांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाच्या या विभागाला स्थायी व पूर्णवेळ अधिकारी नियुक्त करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२६-०५-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
नियंत्रक, वैध मापन शास्त्र या पदावर दिनांक १०/०७/२०२४ पर्यंत भारतीय पोलीस सेवेतील

अधिकाऱ्यांकडे नियमित कार्यभार होता.तद्नंतर सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांना देण्यात आला होता.आता, गृह विभाग शासन आदेश दिनांक १५ मे, २०२६ अन्वये भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यास नियमित नियुक्ती देण्यात आली आहे.
(२) माहे डिसेंबर, २०२५ तसेच माहे जानेवारी, २०२६ या दरम्यान वजनात तफावत, चुकीचे लेबलिंग, ज्यादा दर आकारणी या संदर्भात नोंद खटल्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

| महिना | चुकीचे लेबलिंग | वजनात तफावत | ज्यादा दर आकारणी |
|---|---|---|---|
| डिसेंबर, २५ | २८ | ०३ | ०५ |
| जानेवारी, २६ | १९ | ०३ | १९ |

(३) भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या नियमित नियुक्ती करण्याबाबत गृह विभागास विनंती करण्यात आली होती. तद्नंतर गृह विभाग शासन आदेश दिनांक १५ मे, २०२६ अन्वये भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यास नियमित नियुक्ती देण्यात आली असून सदर अधिकारी दिनांक २५ मे, २०२६ पासून नियंत्रक, वैध मापन शास्त्र या पदावर रुजू झाले आहेत.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्वस्त धान्य पुरवठा करणाऱ्या वाहतूक एजन्सींना नियमाबाह्य पध्दतीने मुदतवाढ दिल्याबाबत

**(१०) ७४७८ (२४-०३-२०२६) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत प्रामुख्याने गरीब व गरजु नागरीकांना स्वस्त दरात अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत असून सदर अन्नधान्याची वाहतूक करणाऱ्या एजन्सींचा कालावधी संपुष्ठात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या अन्नधान्य वाहतूक करणाऱ्या एजन्सीज आहेत त्यांनी योग्यप्रकारे व नियमांचे पालन न करता तसेच विहीत कालावधीत अन्नधान्यांचे वितरण केले नाही अशा सिल्व्हर रोड लाईन्स व इतर एजन्सींज यांना नियमबाहय मुदतवाढ देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सिल्व्हर रोड लाईन्स व इतर अन्नधान्य वाहतूक एजन्सींवर कारवाई करून काळया यादीत टाकण्याच्या तसेच त्यांना देण्यात आलेली मुदतवाढ रद्द करण्याबाबत तसेच नियमबाह्य पध्दतीने मुदतवाढ देणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०९-०६-२०२६) :** (१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य वाहतूकीकरीता दिनांक १५/०१/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या ५ परिमंडळे व २१ जिल्ह्यातील वाहतूक कंत्राटांचा कालावधी संपुष्टात आला असून सदर वाहतूक कंत्राटे मुदतवाढीमध्ये काम करत आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे नवीन बायपास रस्ता मंजूर करण्याबाबत

**(११) ७६८० (२४-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) गावातील वाहतूक कोंडी व अपघातांची समस्या सोडवण्यासाठी मलकापूर येथे जाण्यासाठी नवीन बायपास रस्ता मंजूर करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधीनी मा.सार्व. बांधकाम मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली असल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुऱ्हा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे नवीन बायपास रस्ता मंजूर करून त्यास प्रशासकीय मान्यता देणेकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०४-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर बायपास रस्त्याकरीता ढोबळ अंदाजपत्रक व भुसंपादन करीता प्राथमिक सर्व्हेक्षणाची कार्यवाही सुरु असून सदरचे काम निधी, निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

---

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबत

**(१२) ७७२३ (२४-०३-२०२६) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्याप रजा रोखीकरणाचा (Leave Encashment) लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचा लाभ देण्यात येतो, त्या धर्तीवर समाजकार्य महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचा लाभ लागू करण्याबाबत शासनाचा विचार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (०९-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) समाजकार्य महाविद्यालयांमध्ये अर्जित रजा अनुज्ञेय असलेल्या कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार महानगरपालिकेच्या ऐतिहासिक तलावांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१३) ७७६० (०४-०३-२०२६) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.५६, ८४ आणि ९४ मधील पुरातन काळातील ऐतिहासिक तलावांच्या देखभाल, दुरुस्ती आणि स्वच्छतेकरीता मागील पाच वर्षात सुमारे १० कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात येऊनही तलावांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलावांच्या संवर्धनासाठी आलेल्या निधीचा विनीयोग न करता, पालिका अधिकारी कंत्राटदाराशी आर्थिक संगनमत करुन शासकीय निधीचा अपहार करणे, माहिती अधिकारात माहिती लपवणे आणि भूमाफियांना पाठीशी घालून तलावांच्या जागेवर अतिक्रमणे होऊ देणे सदर गंभीर बाबी निर्दशनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलावांमध्ये परिसरातील नाले, मैलपाणी आणि सांडपाणी थेट सोडले जात असल्यामुळे तलावातील पाणी दूषित झाल्याने तलावाच्या मूळ स्त्रोताला धोका निर्माण होऊन परिसरामध्ये जलजन्य रोग आणि साथीचे आजार पसरल्याने भाविकांच्या व नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पुरातन काळातील ऐतिहासिक तलावांच्या देखभाल, दुरुस्तीकरीता प्राप्त झालेल्या निधीचा अपव्यय करणाऱ्या वसई-विरार महानगरपालिकेतील संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
प्रभाग ५६,८४ व ९४ मध्ये एकूण १६ मोठे तलाव असून, त्यापैकी निर्मळ विमल तलाव व मालाई तलाव हे ०२ पुरातन तलाव आहेत. सदर ०२ तलावांवर देखभाल दुरूस्ती व स्वच्छतेसाठी महानगरपालिकेकडून खर्च करण्यात आला नाही.
(२) हे खरे नाही.
प्रभाग ५६,८४ व ९४ मध्ये एकूण ३८ लहान मोठे तलाव असून, त्यापैकी १६ मोठे तलाव व २२ बावखल आहेत. त्यापैकी भादाळे तलावावर एकूण रक्कम रुपये ३,०३,४०,३४६/- इतका खर्च मागील ०५ वर्षात करण्यात आलेला आहे. तसेच निर्मळ विमल तलावांच्या बांधावर आदिवासी बांधवांच्या कच्च्या १० झोपड्या ८-१० वर्षापासून असून, इतर तलावांचे ठिकाणी अतिक्रमण झालेले नाही.
(३) हे खरे नाही.

प्रभाग ५६,८४ व ९४ मध्ये एकूण ३८ लहान मोठे तलाव असून, सदर तलावांच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे जलजन्य रोग व साथीचे आजार पसरल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी-वाडा-मनोर महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१४) ७७६१ (२८-०२-२०२६) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-वाडा-मनोर महामार्गासाठी रुपये ७७६ कोटी रुपये खर्चून होत असलेल्या महामार्गाच्या कामात तत्कालीन उपअभियंता व कंत्राटदार यांच्या अर्थपूर्ण संबधांमुळे निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जाऊन सुमारे ५०० हून अधिक निष्पाप नागरिकांचा बळी गेला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत गुणवत्ता व नियंत्रण विभागाने स्पष्ट अहवाल दिलेला असतानाही, कार्यकारी अभियंता यांनी दोषींवर कारवाई करण्याऐवजी त्यांना जाणीवपूर्वक पाठीशी घातल्याचा गंभीर आरोप स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी पुराव्यानिशी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे व धुळीच्या प्रदूषणामुळे लहान मुले आणि वृध्दांना श्वसनाचे गंभीर आजार झाले असून, सदर प्रकरणी नागरिकांनी संतापाची तीव्र भावना व्यक्त करुनही कंत्राटदाराला कोट्यवधी रक्कमेची देयके अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोषी तत्कालीन उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांच्या बेहिशोबी मालमत्तेची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(५) असल्यास, संबंधित कंत्राटदाराला कायमस्वरुपी काळया यादीत टाकून या संपूर्ण प्रकरणाची विभागीय (एसआयटी) चौकशी करुन सविस्तर चौकशी करुन त्यानुषंगाने आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (११-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

भिवंडी-वाडा-मनोर रस्त्याचे बांधकाम प्रथमत: खाजगीकरणातून उद्योजकातर्फे करण्यात आले होते. सवलत कालावधीत रस्त्याची झालेली दुरावस्था व स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना यांनी वेळोवेळी केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन शासनाने उद्योजकाबरोबर केलेला करारनामा रद्द करून पथकर बंद केलेला आहे. आता सदरचे काम शासनाने स्वतंत्रपणे प्रशासकीय मान्यता देऊन कंत्राटदाराच्या माध्यमातून हाती घेतले असून काम पूर्ण करण्याची तारीख १४/०४/२०२७ पर्यंत आहे.

(२) हे खरे नाही.

दक्षता व गुण नियंत्रण मंडळ,कोकणभवन,नवी मुंबई मार्फत सद्य:स्थितीत सुरू असलेल्या कामाची तपासणी करण्यात आलेली असून, त्यांचेमार्फत कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत आक्षेपार्ह अहवाल प्राप्त झालेला नाही. तसेच, दैनंदिन काम प्रगतीत असताना कामाची योग्य गुणवत्ता राखण्याकरीता प्राधिकरण अभियंता (Authority Engineer) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत वनविभागातील रस्त्याची लांबी मधील काँक्रिटीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले नाही. या ठिकाणी रस्त्याचा पृष्ठभाग खड्डे भरून वाहतुकीसाठी तात्पुरत्या स्वरूपात सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. या भागामध्ये वाहतुकीमुळे तसेच वळण रस्त्यावरील वाहतुकीमुळे या भागातील रस्त्यावर धुळीचे प्रमाण वाढलेले आहे. अशा ठिकाणी पाण्याचा वापर करून, धूळ प्रतिबंधक उपाययोजना कंत्राटदारामार्फत अंमलात आणण्यात येत आहेत. कंत्राटदारामार्फत पूर्ण करण्यात आलेल्या कामाची मोजमापे प्राधिकरण अभियंता यांचेकडून निविदा अटी शर्तीनुसार तपासण्यात येतात व त्याप्रमाणे वेळोवेळी देयके अदा करण्यात येतात.

(४) सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर अंतर्गत सुरू असलेल्या कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत गुणवत्ता व नियंत्रण विभागाचा कोणताही अहवाल प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पांढरीपूल ते शेवगाव रस्ता दुरुस्तीच्या कामात कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याबाबत

**(१५) ७७७७ (२८-०२-२०२६) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरीपूल ते शेवगाव रस्ता दुरुस्तीच्या कामात कंत्राटदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे जनतेच्या जीवीतास धोका निर्माण झाला असून, पाथर्डी उपविभागीय कार्यालयाच्या अभियंत्यांनी प्रत्यक्ष पाहणीत त्रुटी मान्य करुनही अद्याप कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागीय उपअभियंता, कार्यकारी अभियंता आणि कंत्राटदार यांच्यातील आर्थिक संगनमताचे व अनियमततेचे पुरावे ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांकडे लेखी स्वरुपात देऊनही, या दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घातले जात असल्याची बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निकृष्ट कामामुळे भविष्यात होणाऱ्या संभाव्य अपघातांना आणि जीवितहानीला जबाबदार धरुन या प्रकरणातील विभागीय उपअभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांची विभागीय चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला कायमस्वरुपी काळया यादीत टाकून त्याने आजवर केलेल्या सर्व कामांची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याबाबत व सदर कामांचा गुणवत्ता अहवालाचा सविस्तर ताळेबंद अहवाल सादर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सदर रस्ता दुरुस्तीच्या कामात वापरलेल्या साहित्यांची गुणवत्ता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, जिल्हा प्रयोगशाळा, अहिल्यानगर यांचे मार्फत तपासण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत खड्डे भरण्याचे काम पूर्ण झाले असून अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार इतर अनुषंगीक कामे प्रगतीत आहेत.

(२) या संदर्भातील निवेदन अभिलेख्यांवर दिसून येत नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आमदार निवास सेवेत कार्यरत असलेल्याना चतुर्थश्रेणी गट-ड मधील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(१६) ७८६६ (२४-०३-२०२६) श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील आमदार निवास उपविभागांतर्गत सन १९९७ पासून सेवेत कार्यरत असलेल्या व सन २०१९ पासून सेवेत कायम करण्यात आलेल्या चतुर्थश्रेणी गट-ड मधील ६० कर्मचाऱ्यांनी दिनांक ०२ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार समकक्ष वेतनश्रेणी असलेल्या कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा.मुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना दिनांक २५ डिसेंबर, २०२५ रोजी लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने ड वर्ग श्रेणीतील ६० कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०५-०५-२०२६) :** (१) चतुर्थ श्रेणी (गट-ड) कर्मचारी आमदार निवास उपविभाग, विधानभवन, सार्वजनिक बांधकाम सेवा केंद्र यांनी दिनांक १७/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये "वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १६ मार्च,२०२४ नुसार सातव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणीतील त्रुटीचे निवारण करण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या समितीसमोर चतुर्थ श्रेणी (गट-ड) कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाकडील समतुल्य सुधारित वेतन संरचना समकक्ष वेतनश्रेणी एस-१ ऐवजी सुधारित वेतनश्रेणी एस-५ लागू करणेबाबत" मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली आहे.

(२) वित्त विभागाने दिनांक ३१/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये वेतन त्रुटी निवारण समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यास दिनांक १०/०६/२०२४ पर्यंत अंतिम मुदतवाढ दिली होती. वेतन त्रुटी निवारण समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याची मुदत दिनांक १०/०६/२०२४ रोजी संपुष्टात आल्यामुळे चतुर्थ श्रेणी (गट-ड) कर्मचारी आमदार निवास उपविभाग विधानभवन, सार्वजनिक बांधकाम सेवा केंद्र यांनी दिनांक १७/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीचा विचार करणे शक्य झाले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव राज्य उत्पादन शुल्क विभागाने खरेदी केलेल्या ड्रोनचा वापर करण्यात येत असल्याबाबत

**(१७) ८०९४ (२४-०३-२०२६) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध दारू भट्ट्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ६० लाख रूपयांचा ड्रोन खरेदी केला असून, त्यासाठी को-पायलट/प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे अवैध दारूविरोधी कारवाई प्रभावीपणे राबविता येत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असल्यास, ड्रोन उपलब्ध असूनही ते वापरात न आल्यामुळे अवैध दारू उत्पादन, वाहतूक व विक्री रोखण्यात अडथळे येत असून, परिणामी शासकीय महसुलाचे नुकसान व कायदा-सुव्यवस्थेच्या राखली जात नसल्याची बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे सध्या किती ड्रोन उपलब्ध आहेत, त्यापैकी किती ड्रोन प्रत्यक्ष कार्यान्वित आहेत, तसेच ड्रोन ऑपरेट करण्यासाठी प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी व को-पायलटांची संख्या किती आहे,

(४) असल्यास,ड्रोन खरेदीसोबतच को-पायलट उपलब्धता, प्रशिक्षण, देखभाल व तातडीची कार्यान्वित योजना तयार करून अवैध दारूविरोधी कारवाई अधिक प्रभावी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (०५-०५-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून सन २०२३-२४ मध्ये जळगाव जिल्ह्यातील अवैध मद्य निर्मिती व विक्री वर कारवाई करण्यासाठी ड्रोन खरेदी करण्यात आला. प्रकरणी संबंधित पुरवठादाराकडून विभागातील ४ अधिकारी/कर्मचारी यांना ड्रोन वापराबाबतचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. तदृनंतर सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये ९ वेळा विविध कारवायांमध्ये सदर ड्रोनचा वापर करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही,

डोंगराळ भाग/टेकड्या, नाले, नदीकाठ अशा दुर्गम व दलदलीच्या भागात सराईत गुन्हेगारांकडून अवैध हातभट्टीची निर्मिती होते किंवा कसे याची कारवाईपूर्वी पडताळणीकरीता ड्रोनचा प्रामुख्याने वापर केला जातो. सर्वसाधारणपणे अवैध धंद्याविरुध्द ड्रोनच्या वापराशिवाय विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून नियोजनपूर्वक कारवाया केल्या जातात. त्यानुसार जळगाव जिल्ह्यात विविध कारवायांमध्ये सन २०२५-२६ मध्ये एकूण १८७२ गुन्हे दाखल केलेले असून यामध्ये एकूण १८३३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून जळगाव व ठाणे जिल्ह्यात प्रत्येकी १ ड्रोन खरेदी करण्यात आलेले असून त्यापैकी १ ड्रोन सध्या कार्यान्वित असून दुसऱ्याची दुरुस्ती करण्याची कार्यवाही सुरु आहे. ठाणे जिल्ह्यात १२ व जळगाव जिल्ह्यात ४ अधिकारी/कर्मचारी यांना ड्रोन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोदवड (जि.जळगाव) येथे तालुका क्रीडा संकुलाकरीता शासकीय जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) ८२७० (२४-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (जि.जळगांव) येथील क्रीडा संकुलासाठी शासकीय भूखंड उपलब्ध नसल्याने शहरालगतच्या ग्रामीण भागातील शासकीय जागेवर क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे बोदवड तालुक्यातील खेळाडूंना हक्काचे आणि आधुनिक सुविधांनी सज्ज असे क्रीडा संकुल मिळणार असून धुळे, नंदुरबार, जळगाव या भागातील आदिवासी विद्यार्थी, खेळाडू यांच्यासाठी हे क्रीडासंकुल उपयुक्त ठरेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जागा निश्चित करून संकुल उभारणीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२६-०५-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

बोदवड तालुका क्रीडा संकुलासाठी जागा प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न सुरू असून अद्याप जागा प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) बोदवड तालुका क्रीडा संकुलासाठी जागा प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील वृक्षतोड रोखणे व वृक्षारोपण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत

**(१९) ८४६२ (०४-०३-२०२६) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेने विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील ६ हजार ३०० पेक्षा अधिक झाडे तोडण्याची परवानगी दिली असून, त्या मोबदल्यात संबंधित विभागाने ८९ हजार नवीन झाडे लावली नसल्यामुळे शहराची हिरवळ ३१ टक्क्यांवरून केवळ १२ टक्क्यांवर शिल्लक राहिली आहे, तसेच सन २०११ पासून वृक्षगणना करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ही माहिती विचारात घेता राज्य शासन व महानगरपालिका आयुक्ताना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे निदेश दिले असून महानगरपालिकेचे वृक्ष प्राधिकरण अवैध पध्दतीने कार्य करीत असून प्राधिकरणात तज्ञ सदस्यांच्या अभावामुळे वृक्ष तोडीला यांत्रिक परवानगी दिली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली जीआयएस वृक्षगणना पूर्ण करण्यात यावी,पर्यावरणीय

नुकसान रोखण्यासाठी कायदेशीर वृक्ष प्राधिकरण स्थापन करुन अवैधपणे वृक्षतोड करणाऱ्यांवर पोलीसानी कारवाई करावी इ.मागण्या याचिकाकर्त्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वृक्ष प्राधिकरण हे विकास प्रकल्पांना प्राधान्य देताना पर्यायी वृक्षारोपणाच्या नियमांचे उल्लंघन करून महाराष्ट्र वृक्षसंरक्षण आणि संवर्धन कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वृक्षतोडीला सर्रास व यांत्रिकपणे परवानग्या दिल्या जात असून यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी करुन व त्या अनुषंगाने बेकायदेशीर वृक्षतोडीला परवानगी देणाऱ्या व वृक्षगणना न करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, शहरातील पर्यावरणाचे नुकसान रोखण्यासाठी शासन कायदेशीर वृक्ष प्राधिकरण स्थापन करणे व प्रलंबित वृक्षगणना पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(७)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०३-२०२६) :** (१) सन २०१९ ते सन २०२५ या कालावधीत नागपूर महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीने विविध विकास प्रकल्पांमधील अडथळा निर्माण करणारे ६,३६५ वृक्ष जमिनीपासून कापण्याची विहित नियमानुसार परवानगी दिली आहे. तोडण्यात आलेल्या वृक्षांऐवजी ८९३०८ पर्यायी वृक्षांच्या बदल्यात एकूण ७५,३८५ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

नागपूर शहराची वृक्ष गणना २०११ मध्ये करण्यात आली होती. त्यानंतर वृक्षगणना २०२३ मध्ये नव्याने सुरु करण्यात आली असून ३१ मे, २०२६ पर्यंत पूर्ण होणे नियोजित आहे. नागपूर शहराची हिरवळ अंदाजे ३० टक्के इतकी आहे.

(२) जनहित याचिका क्र. १२/२०२५ प्रकरणी दिनांक ७ मे २०२५ रोजी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी सन २०१९ पासून वृक्ष तोडीबाबत परवानगी दिलेल्या ६३५६ वृक्षांच्या बदल्यात ८९,३०८ पर्यायी वृक्षांची लागवड करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करण्याचे निर्देश दिले होते.

महानगरपालिकेद्वारे महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५ नुसार वृक्ष प्राधिकरण समिती गठित करण्यात आली आहे. समितीमध्ये आयुक्त, उपायुक्त (उद्यान) व एक तज्ञ सदस्य आहेत. अधिनियमानुसार महानगरपालिकेद्वारे वृक्षतोडीस परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात येते.

(३) हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल जनहित याचिका क्र. १२/२०२५ अन्वये याचिकाकर्त्यांनी वृक्षगणना पूर्ण करण्याबाबत विनंती केली आहे.

(४) हे खरे नाही,

महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५ कलम ८ मधील पोटकलम (४)(ब) नुसार अर्जदारांनी पर्यायी झाडांची लागवड करून झाडांचे Geo-Tag फोटो व झाडांची सात वर्ष जोपासना करणेबाबत प्रतिज्ञापत्र दिल्यानंतरच वृक्ष प्राधिकरण समितीकडून विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून वृक्षतोड करण्याची परवानगी देण्यात येते.

(५) व (६) महानगरपालिकेद्वारे बेकायदेशीर वृक्षतोडीस परवानगी देण्यात येत नाही. नागपूर महानगरपालिकेद्वारे सन २०२३ पासून जीआयएस आधारीत वृक्षगणना करण्यात येत असून आता पर्यंत २९ लक्ष वृक्षगणना पूर्ण झाली आहे. ३१ मे २०२६ पर्यंत संपूर्ण शहरातील वृक्षगणना पूर्ण होणे अपेक्षित आहे.
महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५ कलम ८ मधील कलम (३) नुसार नागपूर महानगरपालिकेचे वृक्ष प्राधिकरण स्थापित करण्यात आले आहे. महानगरपालिकेद्वारे महाराष्ट्र वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५ कलम ३ नुसार प्राधिकरणात अध्यक्ष व इतर असे किमान ५ सदस्य असणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीत वृक्ष प्राधिकरण समितीवर तीनच सदस्य असल्याने तज्ञ व्यक्ती नेमण्याकरीता महानगरपालिकेद्वारे दिनांक ०८ एप्रिल, २०२५ व दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. तथापि, तज्ञ व्यक्तींचा प्रतिसाद न मिळाल्याने इतर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली नाही. समितीमध्ये पुनःश्च जाहिरात देवून अर्ज मागवून सदस्यांची नव्याने नेमणूक करण्याबाबत महानगरपालिकेद्वारे कार्यवाही सुरू आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय शिक्षण विभागाने शाळांमध्ये व परिसरात श्वांनाचा कुत्र्यांचा वावर रोखण्यासाठी यासाठी विविध उपाययोजना करण्याबाबत

**(२०) ८५६२ (१८-०३-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय शिक्षण विभागाने शाळांच्या आवारात तसेच शाळा परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर होऊ नये यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याबाबत संबंधित यंत्रणांना आदेश दिले असल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशात शिक्षकांनी शाळा व परिसरातील भटक्या कुत्र्यांची संख्या मोजण्याबाबत कोणतीही स्पष्ट सूचना नसतानाही, काही शिक्षण अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर स्वतंत्रपणे शाळा व परिसरातील कुत्र्यांची संख्या नोंदविण्यासाठी कॉलम तयार करून नोडल अधिकारी नेमण्याच्या सूचना दिल्या आहेत. परिणामी राज्यभरातील शिक्षण क्षेत्रात संभ्रम व प्रशासकीय गोंधळ निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील शिक्षकांवर आधीच विविध अशैक्षणिक कामांचा मोठा ताण असताना, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत, नगरपंचायत किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कर्मचाऱ्यांकडे सोपविण्याबाबत तसेच शिक्षकांना देण्यात आलेली सर्व प्रकारची अशैक्षणिक कामे बंद करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०५-०६-२०२६) :** (१), (२), व (३) SUO MOTO WRIT PETITION ५/२०२५ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०७/११/२०२४ रोजी भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याबाबत शालेय शिक्षण विभागाने प्रत्येक शाळेच्या परिसराची देखभाल, स्वच्छता तसेच भटक्या श्वानांचा संस्थेच्या परिसरामध्ये वावर असणार नाही. तसेच उघड्यावरील फेकलेले खाद्यपदार्थाचे योग्य विल्हेवाट लावणे याची खात्री करण्यासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करून सदर अधिकाऱ्याची माहिती प्रवेशद्वारावर ठळकपणे प्रदर्शित करावी व अधिकारक्षेत्रातील जिल्हा परिषद, नगरपालिका संस्था/प्राधिकरणाला कळवावे अशा सूचना दिल्या आहेत.

तथापि, शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून शासन निर्णय दिनांक २३/०८/२०२४ अन्वये शैक्षणिक कामे, अशैक्षणिक कामे व आरटीई ॲक्टनुसार करावयाची अनिवार्य कामे याबाबतचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे व स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य विधीमंडळ व संसद यासाठी होणाऱ्या निवडणूकांची कामे ही अनिवार्य कामे आहेत. तसेच दिनांक २३/०८/२०२४ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. ७ मध्ये नमूद करण्यात आलेली अशैक्षणिक कामे शिक्षकांना सोपविण्यात येऊ नयेत, याबाबत इतर विभागांनी त्याच्या क्षेत्रिय कार्यालयांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत.

तसेच शिक्षकांना देण्यात येणारी शैक्षणिक व अशैक्षणिक कामे विचारात घेऊन शिक्षकांना प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा तसेच शिक्षकांची कामे सुलभ व्हावीत यासाठी सरल व युडायस प्रणालींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. तसेच, शाळा स्तरावरील विविध समित्यांचे विलीनीकरण करुन समित्यांची संख्या देखील कमी करण्यात आलेली आहे. त्यामुळे शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची शासन दक्षता घेत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.